# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यासाठी प्रस्तुत प्रबंधिकेचा अभ्यास करताना मला ज्यांचे सहाय्य लाभले त्यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

ही प्रबंधिका मी पूर्ण करू शकलो याचे बव्हंशी श्रेय शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रपाठक, सन्माननीय डॉ.विश्वनाथ शिंदे यांनाच द्यावे लागते. त्यांनी माझ्यावरील स्नेहामुळे वैयक्तिक मार्गदर्शन करण्यापासून ते ग्रंथसंपदा देण्यापर्यंत सहकार्य केले म्हणूनच ही प्रबंधिका मी पूर्ण करू शकलो. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद वाटेल.

प्रस्तुत प्रबंधिकेचे लेखन करताना मराठी विभाग प्रमुख डॉ.कृष्णा किरवले, डॉ.रवींद्र ठाकूर, प्रा.दत्ता बारबोले, प्रा.सदाशिव कांबळे, उत्तम तुपे व बाबाराव मुसळे व यांच्याशी विषयानुषंगाने केलेली चर्चा उपयुक्त ठरली.

आमच्या वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे सचिव ॲड्.बी.एस्.पाटील, (अण्णा) सहसचिव ॲड्. धैर्यशिल पाटील,(बाबा), प्राचार्य बी.एस्.काळे,हिंदी विभाग प्रमुख प्रा.आर.बी.शेंडगे,मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ.एस्.डी. रत्नाकर, इतिहास विभाग प्रमुख प्रा.एच. बी.मुंढे, प्रा. सौ.वृषाली पाटील,सौ.छाया पाटील, डॉ.सौ.कल्पना मोहिते, ग्रंथपाल दि.बा.पाटील, प्रा.विजय गायकवाड, राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग प्रमुख व एम.बी.ए.चे समन्वयक डॉ.सुरेश पाटील, दै.पुढारीचे इस्लामपूर प्रतिनिधी प्रा.अशोक शिंदे,प्रा.अशोक जाधव,प्रा.अरूण

जाधव,प्रा.विलास बोरगे,प्रा. के.बी. पाटील, प्रा. बी. पी. पाटील,डॉ. रघुनाथ शिरगावकर तसेच प्राध्यापक सहकार्यांनी माझ्याबद्दल दाखवलेली आपुलकी, केलेले सहकार्य, वेळोवेळी दिलेल्या प्रेरणा व प्रोत्साहन लाभदायक ठरले.

माझे मित्र प्रा.अश्विनकुमार मुंडे,प्रा.राम घुले, प्रा.युवराज वाघमारे, प्रा. शिवाजी जाधव, (पत्रकार),डॉ. युनुस शेख, सुनिल भिसे, जावेद शेख, आण्णा पाटील, प्रा.कैलास पोटफोडे, सचिन चव्हाण, राजेंद्र मगर, दत्तात्रय मगर (गुरूजी) तसेच मराठी विभागातील कर्मचारी विनायक पाटील व कुसुंबे मामा तसेच आमच्या महाविद्यालयातील श्री. भंडारे, आबा माळी, नामदेव देसाई यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

खडतर जीवनाशी सामना देत असतानासुद्धा माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगले ते माझे आई व पप्पा, भाऊ गणेश, भाच्या प्रियंका व विद्या ग्रामीण साहित्यिक हनुमंत पवार (सर) शहाजी सुतार (गुरूजी), सुरवसे गूरूजी यांच्या आदरांचाही उल्लेख करतो. त्यांनी मला कायमचेच ऋणात ठेवले आहे.

ही प्रबंधिका अचूकपणे व वेळेत टंकलिखित करून दिल्याबद्दल डॉ. एस्.बी पाटील व सौ.सुनिता पाटील यांचाही आभारी आहे.

श्री. अनंता मच्छिंद्र कस्तुरे